# सीअर शॉर्टस्

*तुमच्या चिमुकल्यांसाठी स्टायलिश शॉर्ट शिवायच्या विचारात तुम्ही असाल तर हा ट्युटोरियल तुमच्यासाठीच आहे.*






## लागणारे साहित्य

२ मीटर लांब आणि ४५ इंच रुंद सॉफ्ट प्रिंटेड कॉटन फॅब्रिक मीटर
सिअर शॉर्ट चे टेम्प्लेट जे तुम्ही आमच्या www.ushasew.com या वेबसाईट वरून डाऊनलोड करू शकता.
स्केल
एक इंच रुंदीचे इलास्टिक
फॅन्सी बटन
मॅचींग दोरे
मार्कर
कात्री
आणि पिन




या ट्युटोरियलमध्ये तुम्ही टेम्प्लेट नुसार शॉर्टस् कटिंग करणे, क्रॉच एरिया शिवणे, इनर आणि साईड सिम शिवणे, वेस्ट बँड तयार करून त्यात इलास्टिक टाकणे आणि बॉटम हेम फिनिशिंग करायला शिकणार आहात.








## स्टेप 1 टेम्प्लेट मार्किंग आणि कटिंग

तुमच्या आवडीनुसार कुठल्याही उत्साही रंगाचा कपडा निवडा. इथे दाखवल्याप्रमाणे तो कपडा लांबीतून असा फोल्ड करा की जेणेकरून कपड्याची नॉन प्रिंटेड बाजू तुमच्यासमोर येईल. आता या कपड्यावर www.ushasew.com या वेबसाईट वरून डाऊनलोड केलेले शोर्टस् चे टेम्पलेट पसरवून घ्या. बॅक टेम्प्लेट पासून आपण या कामाला सुरुवात करणार आहोत. बॅक टेम्प्लेट पिन लावून कपड्यावर पक्के करून घ्या. त्यानंतर फ्रंट टेम्प्लेट पिन लावून कपड्यावर पक्के करून घ्या. हे करून झाले की दोन्ही टेम्प्लेट कपड्यावर मार्करने ट्रेस करून घ्या. ट्रेसिंग पूर्ण झाले की टेम्प्लेटला लावलेल्या पिन काढून टाका, टेम्प्लेट बाजूला सरकवा आणि मार्किंगवरून कपडा कट करून घ्या. कपड्याचे दोन्ही पिसेस अत्यंत काळजीपूर्वक कट करून ते बाजू बाजूला ठेवा.

तुमच्याजवळ आता शॉट्र्स चे चार इंडिव्हिज्युअल पीस तयार आहेत.





## स्टेप 2 क्रॉच एरिया स्टिचिंग

शॉर्टस् चे पिसेस एकत्र जोडण्यासाठी सर्वप्रथम क्रॉच एरिया शिवून घेऊया. यासाठी आपण उषा जेनोम वंडर स्टीच शिलाई मशीन वापरणार आहोत. शिवणासाठी कपड्याचा काठ प्रेसर फुटच्या काठाशी जुळवून घ्या. स्टीच सिलेक्टर डायल A वर सेट करा तर स्टीच लेन्थ 2.5 ठेवा आणि शिवायला सुरुवात करा. सुरुवातीच्या काही टाक्यांनंतर रिव्हर्स स्टीच घेऊन टीप पक्की करा. कपड्याच्या शेवटापर्यंत शिवत रहा. दोरा तोडून याच प्रकारे बॅक पिसचे क्रॉच सेक्शन देखील शिवून घ्या. टीप सुरू करताना आणि संपवताना रिव्हर्स स्टीच घ्यायला विसरू नका.
















## स्टेप 3 शॉर्ट चे दोन पार्ट एकत्र जोडण्यासाठी साईड आणि इनर सीम शिवणे

तुमचे क्रॉच एरिया शिवलेले पीस असे दिसायला हवेत. आता फ्रंट आणि बॅक पीसच्या सुलट बाजू एकमेकांसमोर येतील असे दोन्ही पीस ठेवून त्यांच्या साईड आणि इनर सिम शिवायच्या आहेत. प्रथम, इथे दाखवल्याप्रमाणे इनर सिमला पिन लावून घ्या. त्यानंतर इनर सिमवर टिप मारत जसे पुढे जाल तसे पिना काढून टाका. आता दोरा तोडून साईड सिम शिवण्याकडे वळा. एक साईड सीम तिच्या शेवटापर्यंत शिवून घ्या. याच प्रकारे दुसरी साईड सिम देखील शिवून पूर्ण करा. यानंतर कपड्याच्या काठाचे फ्रेइंग टाळण्यासाठी आणि सिम लाईनचे व्यवस्थित फिनिशिंग करण्यासाठी झीगझॅग स्टीच घेण्याची पाळी आहे. यासाठी पॅटर्न सिलेक्टर डायल C वर सेट करा आणि स्टीच लेन्थ 1.5 ठेवून साईड तसेच इनर सिम लाईनवर टीप मारून घ्या. हे आपण परत परत करतो आहोत असं वाटत असलं तरीही ही खुप महत्त्वाची स्टेप आहे.










## स्टेप 4 वेस्टलाइन तयार करणे आणि बॉटम हेम फिनिशिंग करणे

शॉर्टस् ची आतली बाजू बाहेर करा आणि वेस्ट लाईन पाव इंच दुमडून त्यावरून इस्त्री फिरवून घ्या. परत एकदा सव्वा इंच दुमड घेऊन त्यावर इस्त्री फिरवून घ्या. यामुळे आपण घेतलेले फोल्ड व्यवस्थित बसतील आणि त्यावर शिवणे सोपे जाईल. याच प्रकारे संपूर्ण वेस्टलाईन फोल्ड करून घ्या. हीच कृती आपल्याला लेग हेम लाईनवर देखील करायची आहे. यासाठी दोन्ही लेग हेमचे काठ आधी पाव इंच दुमडून त्यावर इस्त्री करून घ्या आणि त्यानंतर परत एकदा सव्वा इंच दुमडून त्यावर इस्त्री फिरवून घ्या.

यानंतर हे कापड मशीनवर शिवण्यासाठी घ्या. स्ट्रेट स्टीचसाठी पॅटर्न सिलेक्टर डायल A वर रिसेट करा.





स्टीच लेन्थ 2.5 ठेवा. वेस्टलाईनच्या फॉल्डवर टीप मारून घ्या. साईड सीमच्या दोन्ही बाजूला दोन इंचाचा गॅप ठेवा.

आता लेग हेमचे फोल्ड देखील शिवून घेऊ. गुड जॉब ! आपली शॉर्टस् जवळपास तयार झाल्याचे तुम्हाला दिसत असेलच.

## स्टेप 5 इलास्टिक अटॅच करणे आणि वेस्टलाईनचे फिनिशिंग








आता 4 ते 9 वर्ष वयोगटासाठी 10 इंच लांबीचा इलास्टीकचा तुकडा तर 10 ते 14 वर्ष वयोगटासाठी 12 इंच लांबीचा इलास्टीकचा तुकडा कट करून घ्या. इलास्टिकच्या तुकड्याच्या एका कोपऱ्यात सेफ्टी पिन अडकवा. यामुळे इलास्टीकचे विरुद्ध टोक सिक्युअर होईल. ही आपली बॅक साइड असून यातून आपण इलास्टिक इन्सर्ट करणार आहोत. यापूर्वी आपण जो दोन इंचाचा गॅप सोडला होता त्यातून इलास्टीक वेस्टबँडमध्ये इन्सर्ट करा. हे करत असताना, इथे दाखवल्याप्रमाणे, इलास्टिकचे अनपिन्ड एन्ड साईड सिमच्या वर आहे याची खात्री करून घ्या. या एन्डवर आपण टीप घेऊन ते योग्य जागी लॉक करणार आहोत. टीप सुरू करताना आणि संपवताना रिव्हर्स स्टीच घ्यायला विसरू नका. दोरा तोडून टाका आणि इलास्टिक वेस्टबँडमध्ये ॲडजेस्ट करून दुसऱ्या दोन इंचाच्या गॅपमधून ओढून घ्या. सेफ्टी पिन अनपिन करून इलास्टिक वेस्टबँडमध्ये परत एकदा इन्सर्ट करा आणि त्याचा एन्ड साईड सिमवर येईल अशा तऱ्हेने ते ॲडजेस्ट करा. त्यावर पूर्वीप्रमाणेच टिप मारून घ्या. हे झालं की, दोन इंचाच्या गॅपवर टीप घेऊन तो बंद करा. याच प्रमाणे दुसऱ्या बाजूचा दोन इंचाचा गॅप देखील टिप मारून बंद करून घ्या.

## स्टेप 6 बटन लावणे

या फायनल स्टेपमध्ये तुमच्या आवडीनुसार तुम्ही शॉर्टस् सुशोभित करणार आहात. आम्ही त्यासाठी काही मॅचींग बटन वापरणार आहोत. सुशोभीकरणाच्या टिप्ससाठी तसेच बटन्स कसे लावावेत याच्या संपूर्ण मार्गदर्शनासाठी आमच्या www.ushasew.com या वेबसाईटला भेट द्या.

शॉर्टस् खूपच सुंदर आणि स्टायलिश दिसतेय ना ? तुमच्या चिमुकल्याची स्टाईल पाहून तुमचे मित्र मैत्रीण आणि इतर पालक नक्कीच इम्प्रेस होतील. तुमचे विचार आम्हाला खाली कमेंट सेक्शनमध्ये नक्की कळवा.